# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

दुपार

दिनांक १८.०९.२०२५ गुरूवार

(कामगिरी)

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, जुगार ड्रंकन ड्राईव्ह कायद्या अंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक १७.०९.२०२५ रोजी नागपूर शहर पोलीसांनी, सर्व पोलीस ठाणे हद्दीत **दारूबंदी कायद्यान्वये ०५ केसेस तसेच, एन.डी.पि.एस. कायद्यान्वये ०१ केस असे एकुण ०६ केसेसमध्ये ०६ ईसमांवर कारवाई करून रू. ११,६८०/— चा** मुद्देमाल जप्त केला. तसेच, महा. जुगार कायद्यान्वये ०४ केसेसमध्ये ०४ ईसमांवर कारवाई करून, रू. ५,७४०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये विविध कलमांखाली एकुण १,०८३ वाहन चालकांवर कारवाई करून एकूण रू. ४,५५,५००/—रू. तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा, युनिट क. ४ पोलीसांची कामगिरी :— घातक शस्त्रा बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक १७.०९.२०२५ चे १२.०० वा. ते १२.३० वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा युनिट क्र. ४, पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे नंदनवन हद्दीत पेट्रोलींग करीत असता, स्टार वाईन शॉपीचे मागे, आदर्श नगर, नंदनवन येथे एक ईसम संशयीतरित्या दिसुन आल्याने त्यास आवाज दिला असता, तो पोलीसांना पाहुन पळु लागला. त्याचा पाठलाग करून, त्यास ताब्यात घेतले. त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने आपले नाव मोहम्मद रमीज रजा शेख, वय २२ वर्षे, रा. आदर्श नगर, नंदनवन, नागपूर असे सांगीतले. त्याची पंचासमक्ष अंगझडती घेतली असता, त्याचे पॅन्टचे आंत कमरेत एक धारदार लोखंडी भाल्याचे पाते किंमती अंदाजे ५००/— चा मिळुन आल्याने जप्त करण्यात आले. घेतला. आरोपी कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकू बाळगूण समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे नंदनवन येथे आरोपीविरूध्द कलम ४, २५ भा.ह.का, सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कारवाई मा. श्री. राहुल माकणीकर, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अभिजीत पाटील सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनात, सपोनि. बारंगे, पोउपनि. आरवेल्ली, पोहवा. युवानंद कडु, पोअं. महेश काटवले यांनी केली.

(गुन्हे)

**१) पोलीस ठाणे अजनी :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक १७.०९.२०२५ चे ०९.०० वा. ते १४.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे अजनी हद्दीत, प्लॉट नं. २०२, लक्ष्मीनगर, गोविंद अपार्टमेंट, नागपुर येथे राहणाऱ्या फिर्यादी सौ. आरती रमेश कश्यप, वय ४८ वर्षे ह्या त्यांचे राहते घराला कुलूप लावून, रेवतीनगर येथे नातेवाईकाचे अंत्यविधीकरीता गेल्या असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने

फिर्यादीचे राहते घराचे मुख्य दाराचे कुलुप तोडुन, घरात प्रवेश करून, बेडरूम मधील कपाटातील रोख १,००,०००/– रू. व सोन्याचे दागीने वजनी ७८ ग्रॅम असा एकुण ३,६८,०००/– रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

यාप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे अजनी येथे पोउपनि. जयप्रकाश घोगरे ८९९९१३५९०५ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ), ३३१(३) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**<u>२) पोलीस ठाणे गिट्टीखदान :– प्राणांतीक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

फिर्यादी संतोष शिवराम उईके, वय ४० वर्षे, रा. शिवशक्ती नगर, हनुमान मंदीर जवळ, पारडी, नागपूर हे नागपुर स्टारबस ला चालक आहेत. दिनांक १७.०९.२०२५ चे १७.४५ वा. चे सुमारास, फिर्यादी हे स्टार बस क्र. एम. एच. ४९ बि.झेड. २७६२ ने पोलीस ठाणे गिट्टीखदान हद्दीत एल.ए..डी. चौक ते व्हेटर्नरी चौक कडे जात असतांना, मोटार सायकल क्र. एम.एच. ४९ व्हि. ८०२५ चा चालक नामे राजेश मौदीकर हा त्याचे सोबत वाहनावर ईतर ०२ मित्र नामे यश व्यंकट पौनिकर, वय २२ वर्षे, व अतुल कपाटे, वय २२ वर्षे तिघेही रा. लालगंज, नागपुर असे ट्रिपलसिट भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या दुचाकी चालवुन फिर्यादीचे स्टारबस ला समोरून धडकले. मोटारसायकल वरील तिघेही जण वाहनासह खाली पडुन गंभीर जखमी झाले. जखमींना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी यश व्यंकट पौनिकर यास तपासुन मृत घोषीत केले. मोटारसायकल चालक राजेश मौदीकर व त्याचा मित्र अतुल कपाटे हे दोघे उपचारकामी दाखल असुन, त्यांचा उपचार सुरू आहे.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या पोलीस ठाणे गिट्टीखदान येथे पोउपनि. इंगळे ९७६५६५६४७० यांनी मोटारसायकल चालक आरोपीविरूध्द कलम १२५(अ), १२५(ब), २८१, १०६, ३२४(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**<u>पोलीस ठाणे यशोधरानगर</u> :–** दिनांक १७.०९.२०२५ चे ०७.०० वा. चे पुर्वी, पोलीस ठाणे यशोधरानगर हद्दीत, रिगल सेलीब्रेशन हॉल, दुकान नं. ११ चे, व्हरांड्यात एक अनोळखी ईसम वय अंदाजे ३५–४० वर्षे वयाचे बेशुध्द अवस्थेत दिसुन आल्याने, पोलीसांनी त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी फिर्यादी अश्वीनीकुमार गेंदलालजी सोनारे, वय ४३ वर्षे, रा. बिनाकी मंगळवारी, यशोधरानगर, नागपुर यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे यशोधरानगर येथे सपोनि. गजानन तेलरांधे यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**<u>१) पोलीस ठाणे सिताबर्डी</u> :–** रोशन लक्ष्मण तुरकेल, वय ३८ वर्षे, रा. मरीयम नगर, सिव्हील लाईन, सिताबर्डी, नागपूर हे दिनांक ०६.०९.२०२५ रोजी १५.०० वा. पासुन पोलीस ठाणे सिताबर्डी हद्दीतुन राहते घरी कोणाला काहीही न सांगता निघुन गेले. परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **<u>वर्णन</u>**– रंग– सावळा, चेहरा– गोल, बांधा– सडपातळ, केस– काळे, उंची– ५ फुट २ इंच, अंगात– काळ्या रंगाची टि–शर्ट व काळ्या रंगाचा लोवर पॅन्ट घातलेला आहे. भाषा– मराठी/हिंदी बोलतात.

**<u>२) पोलीस ठाणे गिट्टीखदान</u> :–** राजकुमार रामलखन पटेल, वय ३४ वर्षे, रा. दुर्गा माता मंदीर जवळ, गणेश नगर, दाभा, नागपूर हे दिनांक १३.०९.२०२५ रोजी १२.०० वा. पासुन पोलीस ठाणे गिट्टीखदान हद्दीतुन राहते घरी कोणाला काहीही न सांगता निघुन गेले. परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **<u>वर्णन</u>**– रंग– गोरा, चेहरा– लांब, बांधा– सडपातळ, केस– काळे, उंची– ५ फुट ६ इंच, अंगात– शर्ट व पॅन्ट घातलेला आहे. भाषा– मराठी/हिंदी बोलतात.

**३) पोलीस ठाणे गिट्टीखदान :–** दुर्गेश युवराज ठाकरे, वय ३३ वर्षे, रा. जगदीश नगर, के.जी.एन. सोसायटी, गिट्टीखदान, नागपूर हे दिनांक १०.०७.२०२५ रोजी १०.०० वा. पासुन पोलीस ठाणे गिट्टीखदान हद्दीतुन राहते घरी कोणाला काहीही न सांगता निघुन गेले. परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **वर्णन**– रंग– गोरा, चेहरा– लांब, बांधा– सडपातळ, केस– काळे, उंची– ५ फुट ५ इंच, अंगात– चेक्सचे फुल शर्ट व जिन्स पॅन्ट घातलेला आहे. भाषा– मराठी/हिंदी बोलतात. ओळख– डाव्या हातावर दुर्गेश नांव लिहीलेले.

**४) पोलीस ठाणे तहसिल :–** घनशाम राजेराम बोकडे, वय ८० वर्षे, रा. तहसिल, नागपूर हे दिनांक ०१.०९.२०२५ रोजी १०.३० वा. पासुन पोलीस ठाणे तहसिल हद्दीतुन राहते घरी कोणाला काहीही न सांगता निघुन गेले. परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **वर्णन**– रंग– गोरा, चेहरा– गोल, बांधा– सडपातळ, केस– पांढरे, उंची– ५ फुट ६ इंच, अंगात– शर्ट व पॅन्ट घातलेला आहे. भाषा– मराठी/हिंदी बोलतात.


रोशन


राजकुमार


दुर्गेश


घनशाम

**स्वा/–**
**(अंकुश उ. राठोड)**
**पोलीस उप–निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**